रयत शिक्षण संस्थेचे,

सदगुरु गाडगे महाराज महाविद्यालय, कराड.

(स्वायत्त महाविद्यालय )

इतिहास विभाग

**अग्रणी महाविद्यालय कार्यक्रम अहवाल २०२३-२४**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये दिनांक मंगळवार, ३० जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयातील A-१/११ मध्ये अग्रणी महाविद्यालयांतर्गत "वस्तुसंग्रहालयातील रोजगारविषयक संधी " या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक म्हणून प्रा. सचिन बोलाईकर, सहा. प्राध्यापक, शिक्षण महर्षी बापुजी सांळुखे महाविद्यालय, कराड हे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना "वस्तुसंग्रहालयातील रोजगारविषयक संधी " या विषयावर मार्गदर्शन केले. बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार आणि बदलत्या परस्थितीनुसार रोजगार ही एक प्रमुख समस्या विद्यार्थ्यांसमोर उभी राहिली आहे. आज शिक्षणाकडे व्यवहारी दृष्टीकोनातून पहिले जाते. शिक्षण हे रोजगार प्राप्तीचे प्रमुख साधन या परिप्रेक्ष्यातून शिक्षणाकडे पाहण्याचा कल विद्यार्थ्यांचा दिवसेंदिवस वाढत आहे. इतिहास या विषयातून पदवी घेतल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर रोजगार हा एक प्रमुख प्रश्न असतो. तो वस्तुसंग्रहालय या क्षेत्रात असणाऱ्या संधीने सोडवता येईल असे त्यांनी आपले मत मांडले. तसेच आज वस्तुसंग्रहालय या क्षेत्रातील केवळ ३५ टक्केच जागा भरण्यात आल्या आहेत तर बाकीच्या जागा या रिक्तच आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रात अजूनही खूप वाव आहे असे त्यांनी सांगितले. परंतु त्यासाठी विद्यार्थ्यांनी आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी मत मांडले.

या कार्यशाळेचे अध्यक्षीय मनोगत इतिहास विभागप्रमुख प्रा. नेताजी सूर्यवंशी सर यांनी व्यक्त केले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना वस्तुसंग्रहालयातील रोजगारविषयक संधी आणि त्याची पूर्तता करणाऱ्या शैक्षणिक संस्था इत्यादींची माहिती दिली. सदर कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. अभय पाटील यांनी केले. तर आभार प्रा. महाजन एस. एम. यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभांगी लाड यांनी केले. तर सदर कार्यक्रमास प्रा. नांगरे पी. एस., प्रा. डॉ. गौडदाब एल. ए., प्रा. के. एस. माथने (वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.), प्रा.

भिसे अमोल कमलाकर, कला व वाणिज्य महाविद्यालय, उंडाळे इत्यादी उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी एकूण ५९ विद्यार्थी उपस्थित होते.

**निष्पत्ती :**

१.विद्यार्थ्यांना इतिहास विषयातील रोजगारविषयक संधीची माहिती समजली.

२. विद्यार्थ्यांना वस्तुसंग्रहालय आणि त्यामधील करिअर विषयक संधी याची कल्पना आली.

३. वस्तुसंग्रहालय आणि इतिहास यांचे ऋणानुबंधाची माहिती विद्यार्थ्यांना झाली.

**लाभार्थी : एकूण ५९**




